**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना या योजनेतील सन २०१८-१९ मधील प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम सन २०१९-२० मधील मंजूर तरतुदीतुन अदा करण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-२०१९/(प्र.क्र.६७/१९)/मशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १४ जून, २०१९

<u>वाचा :</u>

१) शासन पत्र क्रमांक-स्कॉलर-४९१९/प्र.क्र.१३६/मशि-२, दिनांक १४ मे, २०१९.
२) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८-१९/अनौपचारिक संदर्भ/७५६१, दिनांक ४ जून,२०१९.

<u>प्रस्तावना :</u>

सन २०१८-१९ करिता मंजुर करण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन प्राप्त झालेल्या अर्जास अनुसरुन, दि.३१ मार्च, २०१९ नंतर महाऑनलाईन कार्यालयाकडुन अलॉटमेंट प्राप्त झालेल्या सन २०१८-१९ मधील प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज मंजुर झालेल्या विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या वर्षात शिष्यवृत्ती वितरित करण्यास दि.१४.०५.२०१९ च्या शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती या योजनेतील प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम सन २०१९-२० मध्ये मंजुर तरतुदीतुन अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना या योजनेतील सन २०१८-१९ मधील प्रलंबित असलेली रु.४,७७,७२,८८२/- (रुपये चार कोटी सत्त्याहत्तर लक्ष बहात्तर हजार आठशे ब्याऐंशी फक्त) इतकी रक्कम सन २०१९-२० मधील मंजुर तरतुदीतुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबीवर येणारा खर्च "मागणी क्र. डब्ल्यु-०२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च, (०२) (०९) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लक्ष पेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी (२२०२ १४५६) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९ मधील अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ चे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग-१, अनुक्रमांक ६ मधील नियम क्रमांक ४० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील तसेच इतर संबंधीत शासन निर्णयांमधील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१४१५२३०४५९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemantkumar
Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec5420633722d42e0976d82a8, serialNumber=284a4236ae7795d36dd2ecb5ac6ca70c333a3cf1b13f66828d224ae2026b37e9, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2019.06.14 15:07:05 +05'30'

**( हे. पं. बाविस्कर )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. संचालक, उच्च शिक्षण, पुणे.

२. महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

३. महालेखापाल लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

५. कार्यासन (साशि-१) / (मशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. निवडनस्ती, कार्यासन मशि-३.